(१)

# — हरितालिका —

श्रावण, भाद्रपद महिने आले की सणासुदी दिवस आठवतात. सगळे दिवस कसे भरकन निघून जातात. गोडधोड खायच, कहाण्या ऐकायच्या. या सगळ्यात हरितालिका अगदी उठून दिसते. कारण हरितालिका हा सण नाही तर हे अेक व्रत आहे. हे व्रत पार्वतीने महादेव पति मिळवा म्हणून केल होत.

मागच्या जन्मात पार्वती दक्षाची कन्या आणि शंकराची पत्नी सती होती. तिच्या पित्याने शंकराची निंदा केली म्हणून सतीने प्राणत्याग केला. तिने शिवप्रेमासाठी हिमालय आणि मेनका यांच्या उदरी जन्म घेतला. श्रीविष्णूनी हिमालयाकडे पार्वतीची पत्नी म्हणून मागणी केली. तिच्या मातापित्यानेही आनंदाने सम्मती दिली. पण आपल लग्न जर शंकरा बरोबर होणार नसेल तर जगण्यात कांही अर्थ नाही. असा तिने निर्धार केला.

तिची मैत्रिण हे सर्व पहात होती. ती पार्वतीला अेका गुहेत घेऊन गेली आणि तिथे तिने पार्वतीला शिवाची आराधना करण्याचा सल्ला दिला. तिनेही वाळूची पिंडी तयार केली आणि आराधना सुरु केली. दुसऱ्या दिवशी ती नदीवर स्नानाला गेली. तिथे अेक विचित्र घटना घडत होती. तिथे अेक मगर अेका लहान मुलाला गिळत असल्याचे तिने पाहिले. त्या मुलाचे रडणे अैकून पार्वती दुःखी झाली. ती मगरला म्हणाली, "तू मला भक्षण कर पण त्या निरागस मुलाला जीवदान दे." तिने विनवल खर पण मगर म्हणाला "जवळ आलेल्या प्राण्याच भक्षण करण हा माझा हक्क आहे. तूला त्याची अेवढी दया येत असेल तर तू आजवर केलेल्या तपाच पुण्य मला दे."

आता पार्वती संभ्रमात पडली. ज्याच्यासाठी अेवढी तपश्चर्या केली ते पुण्य याला दिले तर प्रभुची प्राप्ती होणार नाही. आणि पुण्य याला दिले नाही तर तो त्या मुलाला खाऊन ~~खाऊन~~ टाकील. प्रेमळ आणि दयाळू पार्वतीने पुन्हा तपश्चर्या करण्याचा निश्चय

PAGE No.
DATE / /

केला, आणि तपश्चर्येचे सर्व पुण्य मुलाचे प्राण वाचविण्यासाठी मगराला दिले. तेवढ्यात तिच्या समोर शिवशंकर प्रगट झाले, आणि म्हणाले, त्यानां पाहून पार्वतीला खूप आनंद झाला तिने त्याना नमस्कार केला. शिव तिला म्हणाले "जो भक्त सर्वांना दुःख मुक्त करण्यासाठी सर्व समर्पण करतो तो भक्त मला खूप प्रिय आहे. आज सद्भक्त म्हणून माझ्या परीक्षेत पास झाली आहेस, म्हणून मी तुझा पत्नी म्हणून स्विकार करतो आहे.

माता-पित्याच्या संम्मतीने पार्वतीचा विवाह शिवाशी झाला. तो दिवस भाद्रपद शुध्द तृतियेचा होता. या सर्व घटनेत पार्वतीला तिची मैत्रिण सखी हिचे अनमोल सहाय्य झाले म्हणून हरितालिकेच्या दिवशी शिव-पार्वती बरोबर सखीचीही पूजा करतात. हरितालिका म्हणजे हरित म्हणजे हरण करणे, आणि आलिका म्हणजे मैत्रिण सखी. जी मैत्रिणीचे हरण करते ती हरितालिका होय.

या दिवशी बाजारात मातीच्या रंगीत सखी-पार्वतीच्या मूर्ती मिळतात. उत्तम पतिच्या प्राप्ती आणि दिर्घायुसाठी भारतीय स्त्रिया हे व्रत करतात. या दिवशी उपवास करुन एका चौरंग अगर पाटावर सखी व पार्वती व शिव यांच्या मूर्ती स्थापन करुन पूजा करतात. बेल, पुष्प, पत्री वाहून सद्भावे प्रार्थना करतात. नैवेद्य दाखवून आरती करतात. हरितालिके आरती खूप गोड आहे. "जय देवी हरितालिके सखी पार्वती अंबिके

"नारी या पूजताती यासी काय तू देशी"
"कांकणे वज्रचुडे नारी या वाहताती"
"अखंड सौभाग्य पुत्र राज्य संपत्ती
"जय देवी हरितालिके"

आरती झाल्यानंतर घरातील स्त्रिया फराळ

(५)

करतात. संध्याकाळी सुहासिनींना बोलवून त्यांच्या ओट्या भरतात. रात्री गौरी समोर जागरण करतात "ॐ नमः शिवाय" असा जप करतात. भजन करतात, गाणी म्हणतात. सकाळी लौकर उठून सुचिर्भूत होऊन तिला दहीपोहे, फळे किंवा मुगाच्या डाळीची खिचडी यापैकी अेकाचा नैवेद्य दाखवून आरती करतात. नंतर पाटावरील सर्व साहित्यासह विसर्जन करतात.



सुषमा जोशी.
पंचरत्न अपार्टमेंट
परांजपे शाळेजवळ
कोथरुड, पुणे ३८.
मो.नं. ९७६७६४३६६४

शब्दकोडे ११ उत्तरे.

(१) कढई, लोळ, पुरी (२) डोक्यावरचे केस (३) समई, तेल, वात

(४) डोळे (५) शेंबुड (६) दात, जीभ

(७) चांदण्या, चंद्र (८) कांदा (९) कुलूप

(१०) फुंकणी (११) उंबराचे फूल (१२) पोपट (१३) आंबा

(१४) वांग (१५) बासरी.